Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730 AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III / Hindi Part - I

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Principal
...har Arts, Science & Com...
...dur, Tal. Tuljapur, Dist. Osmana...

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास<br>प्रा. डॉ. सुनिल रजपूत | ६०-६४ |
| १५ | महिला सक्षमीकरण<br>डॉ. वी. व्ही. डोंगरे (पाटील) | ६५-६८ |
| १६ | मतदार जागृती काळाची गरज<br>प्रा. डॉ. नितिन बी. कावडकर | ६९-७३ |
| १७ | समकालीन मराठी ग्रामीण साहित्यातील सामाजिकता<br>प्रा. डॉ. परमानंद बा. बावनकुळे | ७४-७९ |
| १८ | मराठी साहित्य आणि विनोद<br>रश्मि मधुकरराव खैरकार (बोबडे) | ८०-८४ |




Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

VOLUME - VIII, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# १४. उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास

प्रा. डॉ. सुनिल रजपूत
इतिहास विभाग, जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना**

पर्यटन हे फुरसतीचा वेळ घालविण्याचे एक साधन म्हणून जगभरात अतिशय लोकप्रिय झाले आहे. प्रवास हा माणसाचा प्राचीन काळापासूनचा छंद आहे. मध्ययुगीन काळात नव-नवीन प्रवाशी मार्गांच्या शोधा बरोबर व्यापार वाढविणे व नवीन प्रदेश हस्तगत करणे हा प्रवासाचा उद्देश होता. पहिल्या महायुध्दानंतर पर्यटन एक उद्योग म्हणून समोर आला व दुस-या महायुद्धानंतर पर्यटन या व्यवसायाची निर्मिती झाली. पर्यटन उद्योगाचे स्वरूप जरी पारंपारिक उद्योगासारखे नसले तरी त्या उद्योगात रोजगारभिमुखता अधिक आहे. कारण पर्यटन उद्योग हा मूलतः सेवा उद्योग आहे. पर्यटनामध्ये प्रामुख्याने भौगोलिक,सांस्कृतिक, ऐतिहासिक व धार्मिक स्वरूपाचे पर्यटन अधिक प्रमाणात आढळते आणि पर्यटक याला अधिक पसंती देतात.

पर्यटनामुळे हाताला काम मिळते, उत्पन्नात ही भर पडते आणि या निमित्तानं आपली संस्कृती जपायला मदत होते, इतिहासाला उजाळा देता येतो. पुढच्या पिढीसाठी आपला इतिहास जीवंत राहतो. त्यासाठी स्थानिक पातळीवर पर्यटनाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्यामुळेच संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास असा विषय निवडला आहे.

**पर्यटन म्हणजे काय ?**

एका व्यक्तिने किंवा व्यक्ति समूहाने एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. पर्यटनाची सुरूवात नक्की कोठून होते आणि कुठे संपते हे सांगणे अवघड आहे. परंतू सर्वसाधारणपणे आपल्या मनात एखाद्या जागेविषयी आवड निर्माण होते तेथूनच खरी पर्यटनाची सुरूवात होते आणि तेथे जाऊन तो अनुभव घेऊन येईपर्यंत पर्यटन हे सुरूच असते.

**उस्मानाबाद जिल्ह्याचे स्थान व विस्तार**

उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण भागात स्थित आहे. हा जिल्हा मराठवाडयात त्याच्या नैऋत्येला आहे. जिल्ह्याचा बहुतांश भाग खडकाळ तर उर्वरीत भाग सपाट आहे. जिल्ह्याचा बहुतांश भाग बालाघाट नावाच्या लहान पर्वताने व्यापलेला आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 7512.4 चौ. कि.मी. आहे. त्यापैकी शहरी भागाचे क्षेत्रफळ 241.4 चौ.कि.मी. तर ग्रामीण भागाचे क्षेत्रफळ 7271.0 चौ.कि.मी. आहे. जिल्ह्याचे वातावरण साधारणपणे कोरडे असते.

उस्मानाबाद जिल्हा हा सोलापूर, अहमदनगर, बीड, लातूर, बिदर व गुलबर्गा या जिल्ह्यांनी व्यापलेला आहे. हा जिल्हा मराठवाडा विभागाच्या पूर्व बाजूला उत्तरेस 17.35 ते 18.40 डिग्री अक्षांश आणि पूर्वेस 75.16 ते 76.40 डिग्री अक्षांश मध्ये स्थित आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

अभ्यास क्षेत्र

उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर हे देशातील प्रसिध्द देवस्थान आहे. कळंब हे जिल्ह्यातील व्यावसायिक दृष्ट्या महत्वाचे ठिकाण आहे. येरमाळा येथे येडेश्वरी देवीचे मंदिर आहे. नळदुर्ग व परांडा हे ऐतिहासिक ठिकाण किल्ल्यांसाठी प्रसिध्द आहे. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यात संत गोरोबा मंदिर, कुंथलगिरी येथील जैन मंदिर , तेर येथील पुराणवस्तूसंग्रहालय प्रसिध्द आहे. तसेच उस्मानाबाद जिल्हा शेळयांसाठी प्रसिध्द आहे. त्यामुळे " उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास " या अभ्यास क्षेत्राची निवड केली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळे

उस्मानाबाद जिल्हा हा अनेक ऐतिहासिक व पौराणिक घटनांचा साक्षीदार राहिला आहे. त्यामुळे या जिल्ह्यात पुढीलप्रमाणे ऐतिहासिक व धार्मिक स्थळे ही पर्यटनाची स्थळे म्हणून प्रसिध्द आहेत.

1) येडशी

हे एक रेल्वेस्थानक व व्यापारी गाव आहे. येथून जवळच रामलिंग मंदिर व दुर्गादेवी मंदिर आहे. रामलिंग मंदिर हे उंचावर असल्याने येथील हवा थंड असते. पावसाळयात अनेक सुंदर धबधबे व मोरांचे थवे येथे पाहायला मिळतात. येथे येडशी- रामलिंग घाट अभयारण्य आहे. येडशी अभयारण्यातील दुर्गादेवी टेम्पल हे ठिकाण समुद्रसपाटीपासून अंदाजे पाच हजार फूट उंचीवर असलेले व ब्रिटिशकालीन थंड हवेचे ठिकाण म्हणून तसेच रेस्टाऊस म्हणून त्यावेळी वापरात असलेल सुंदर ठिकाण आहे.

2) तेर

येथे जुना गड व उत्खणनात सापडलेली कुंभार आहे. तर ( तगर ) हे संत गोरोबा काकांच्या स्पर्शाने पावन झालेले ऐतिहासिक ठिकाण आहे . तर या ठिकाणाचा व्यापार युरोप बरोबर होता. याचे अनेक पुरावे आहेत. याठिकाणी पाण्यावर तरंगाणा-या विटा आहेत. येथे बौध्द काळातील मोठा स्तुप आहे.

येथे गोरोबा काका मंदिर , रामलिंगाआप्पा लामतूरे पुराण वस्तू संग्रहालय तसेच भगवान महावीरांच्या पदस्पर्शाने पावन झालेले जैन मंदिर आहे. हे जैन मंदिर त्यावरील कोरीव कामामुळे पाहण्यासारखे आहे.

3) तुळजापूर

हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. येथे तुळजाभवानीचे मंदिर आहे. बालाघाट डोंगराच्या 609 मी उंचीच्या पठारावरील हे ठिकाण असून सोलापूर पासून 45 कि.मी. व उस्मानाबाद पासून 23 कि.मी. अंतरावर आहे. तुळजापूरचे मुख्य आकर्षण महणजे येथील तुळजाभवानी देवीचे मंदिर होय. "तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येथे लाखो भाविक येतात. तुळजापूरची गणना प्रमुख शक्तिपीठात केली जाते. भवानीचे मंदिर पठाराच्या पश्चिम उताराच्या माथ्यावर आहे. मंदिर दगडी व सुंदर कोरीव काम करून बांधण्यात आलेले आहे. येथील दस-याचा नवरात्र महोत्सव पाहण्यासारखा असतो. यात्रेच्या वेळी कापड, भांडी, अन्नधान्य इ.चा मोठा व्यापार येथे भरतो. नवरात्रीच्या वेळी भाविकांची सोय व्हावी म्हणून अनेक राज्यातून बससेवा मोठया प्रमाणात उपलब्ध केली जाते.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

प्रभू श्रीराम लंकेस जाताना येथे आले होते, व भवानी मातेने त्यांना पुढील मार्ग दाखविला अशी दंत कथा आहे. विजापूरच्या अफझलखानाने येथील देवीची मूर्ती फोडल्यामुळे शिवाजी महाराजांनी नवीन मूर्तीची स्थापना केली. याच भवानी मातेने त्यांना भवानी तलवार दिली होती असे सांगितले जाते. देवीच्या जामदार खान्यात शिवाजी महाराजाचे नाव असलेले सोन्याचे दागिने आहेत.

**4) नळदुर्ग**

हे ठिकाण उस्मानाबाद पासून 58 कि.मी. तुळजापूर पासून 32 कि.मी., सोलापूर पासून 48 किमी आणि उमरगा या शहरापासून 40 कि.मी. अंतरावर आहे. हा किल्ला 'न' च्या आकाराचा असल्यामुळे हा किल्ला नळदुर्ग या नावाने ओळखला जातो. या परिसरात असलेल्या भुईकोट किल्यामध्ये हा किल्ला अभेद्य, अजिंक्य समजला जातो.

नळदुर्ग शहर अणि किल्ला समुद्रसपाटीपासून 67.56 मीटर उंचीवर आहे. किल्ला बोरी नदीच्या काठावर बांधण्यात आला असून त्याची रचना विशिष्ट स्वरूपाची केल्यामुळे हा किल्ला शत्रूला जिंकणे कठीण आहे. या किल्लयाचे रणमंडल आणि शहादुर्ग असे दोन भाग आहेत. रणमंडलाचे क्षेत्रफळ 26 एकर तर शहादुर्ग या किलयाचे क्षेत्रफळ 77 हजार 16 गुंठे आहे. या दोन्ही किल्यांचे मिळून एकुण क्षेत्रफळ 104 एकर 16 गुंठे आहे. या दोन्ही किल्यांना आज नळदुर्ग किल्ला म्हणून ओळखले जाते.

किल्याच्या भोवती संरक्षणासाठी खोल खंदक खोदला आहे. या खंदकालाच परिखा असेही म्हणतात. खंदकामामध्ये रूंदी आणि खोली सर्व ठिकाणी सारखीच नाही. शहराच्या बाजून खंदाकाची रूंदी जवळपास 50 फूट आणि खोली 25 फूट आहे.

किल्याभोवती संरक्षणासाठी अरूंद अशी भिंत बांधली जाते. अशा भिंतीलाच तटभिंत किंवा तटबंदी म्हणतात. या किल्याची तटबंदी जास्तीत जास्त 100 फूट आणि कमीत कमी 65 फूट उंच दिसते. किल्याची बाहेरची तटबंदी इ.स.1598 मध्ये बांधली गेली.

किल्याला एकूण 114 बुरूज महत्वाचे आहेत. उपल्या बुरूज हा किल्याच्या तटबंदीत नसून किल्यातील मध्यभागात सपाट जमिनीवर बांधलेला आहे. या बुरूजाला "टेहळणी बुरूज" असेही म्हणतात.

किल्यात अनेक प्रकारच्या लहान मोइया तोफा आढळतात किल्याच्या तटबंदीला शत्रुवर बुंदूकीचा मारा करण्यासाठी छिद्रे ठेवलेली आहेत. त्यांना " जंगी" किंवा "जंग्या" म्हटले जाते. या किल्यात मुख्यप्रवेशद्वार ओलांडून पुढे गेल्यास अंबरखाना आहे. तसेच किल्यात निजाम कोर्ट, मस्जिद, राजवाडा, राणीमहल आहे.

नळदुर्गच्या किल्यात उद्यान, किल्लेदारांचे निवासस्थान, शौचालय, स्नानगृह, दरबार महाल, सरदार-कर्मचारी सैनिकगृह, दारूखाना, रंगमहाल, कैदखाना, हत्तीखाना, पागा अशा विविध वास्तू आहेत.

या किल्याचे खास वैशिष्ट्ये म्हणजे येथील पाणीमहाल होय. मध्ययुगातील राज्यकर्त्यांनी बोरी या नदीचा उपयोग किल्यासाठी मोठया कल्पकतेने करून घेतला आहे. या किल्यातील पाणी महाल ही वास्तू येथील बोरी नदीवर बांधलेल्या बंधा-यात पाणी जास्त झाल्यावर ते पाणी महालवरून वाहत जाते. हे फार मोठे आश्चर्य आहे. पाणी महालवर दोन धबधबे आहेत.

Principal
Jawahar Arts. Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

हे दोन धबधबे ' नर ' आणि 'मादी' या नावाने ओळखले जातात. पावसाळयात बोरी नदीला पाणी आल्यावर हे दोन्ही धबधबे ओसंडून वाहतात आणि हे पाहण्यासाठी पर्यटकांची अफाट गर्दी असते.

5) परांडा

हे उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुक्याचे मुख्यालय आहे. हे एक प्राचीन नगर असून याठिकाणी एक भुईकोट किल्ला आहे. या नगराचे प्राचीन नाव पलियण्ड आणि प्रत्यंडक असे होते. पलियण्ड व प्रत्यंडक हे कानडी शब्द असून त्याचा अर्थ 'रमणीय स्थान' असा होतो. या शिवाय परांडा हे नगर परींडा या नावानेही प्रसिद्ध होते.

परांडा नगराच्या मध्यभागी भुईकोट किल्ला वसलेला आहे. या किल्याचे क्षेत्रफळ 18 एकर आहे. या किलयात खंदक, तटबंदी, फांजी , बुरूज, चर्या व विविध बुरूजांवर विविध प्रकार व आकाराच्या तोफा आहेत. किल्यास एकूण चार प्रवेशद्वार होते. त्यापैकी आज केवळ तीन प्रवेशद्वार शिल्लक आहेत. किल्याच्या तिस-या क्रमांकाच्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यास एक मोठी वास्तू दृष्टीस पडते ती वस्तू म्हणजे मस्जिद होय.

परांडा किल्यात राजवाडा, नृसिंह मंदिर, शिवमंदिर , शाही स्नानगृह, पागा, दारूखाना, कर्मचा-यांची घरे, कैदखाना, निजामी मलहाल, जलमहाल, अंबरखाना इ.वास्तू आहेत. हा भुईकोट किल्ला पर्यटकांना आकर्षित करतो. व पर्यटकही येथे मोठया संख्येने किलयास भेट देतात.

6) सोनारी

परांडयाच्या उत्तरेस 7 कि.मी. अंतरावरील सोनारी या गावी श्री कालभैरवनाथ मंदिर आहे. स्कंद पुराणात याचा उल्लेख आढळतो. चंड नावाच्या दैत्याचा मुलगा प्रचंड हा गोदावरीच्या दक्षिण भागात दंडकारण्यात ( हल्लीचे परांडा ) राहत होता. त्याच्या त्रासाने सर्व पीडीत शंकरला शरण गेले. शंकराने काशी क्षेत्राच्या रक्षणासाठी जे 8 भैरव आपल्या नेत्रातून निर्माण केले होते. त्यापैकी कालभैरव याने या प्रचंड दैत्याचा वध केला. त्यानंतर शंकराने त्याला सुवर्णपूरी ऊर्फ सोनारीत राहण्यीच आज्ञा केली. त्यामुळे कालभैरव सोनारीत वास्तव्य करू लागला अशी आख्यायिक सांगितली जाते.

7) अणदूरचा खंडोबा

सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर अणदूर हे गाव आहे. त्याकाळात त्याचे आनंदपूर हे नाव होते मनिमल्ल दैत्याचा संहार करण्यासाठी शंकराने मल्हारी मार्तंड भैरवानाथाचा अवतार धारण केला. अणदूर येथील मंदिर हे हेमाडपंथी असून आवारात अनेक दिपमला आहेत. अणदूर मार्गशीर्ष 6 व मैलारपूरला पौष्य शुध्द 15 ला यात्रा भरते. येथे प्राण्यांचा नव्हे तर पुरणाचा नैवेद्य दिला जातो हे विशेष होय.

8) कुंथलगिरी

उस्मानाबाद-औरंगाबाद रसत्यावर 60 कि.मी. व सरमकुंडी फाट्यापासून डावीकडे 2 कि.मी. अंतरावर पहाडावर हे तीर्थक्षेत्र आहे. भारतात जैन धर्मियांची अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. या तीर्थक्षेत्रांचे सिध्द क्षेत्र, कल्याणक्षेत्र व अतिशय क्षेत्र असे तीन प्रकार समजतात. दक्षिण भारतातील एकमेव दिगंबर जैन सिध्दक्षेत्र म्हणजे कुंथलगिरी तीर्थक्षेत्र होय .

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

9) हजरत शमशुद्दीन गाझी दर्गा

उस्मानाबाद येथे हजरत शमशुद्दीन गाझी यांचा दर्गा प्रसिद्ध आहे. या दर्ग्यात फारशी भाषेतील कोरलेले एक शिलालेख असून त्यात या पुरूषाचा निर्वाण काळ 720 हिजरी असा दिलेला आहे. हा दर्गा फारच भव्य, सुंदर व प्राचीन शिल्कलेच्या दृष्टीने प्रेक्षणीय आहे. दरवर्षी येथे फार मोठ्या प्रमाणात त्यांचा उरूस भरतो. या उरुसामध्ये सर्व हिंदू -मुस्लीम धर्मीय लोक उत्साहाने सहभागी होतात.

10) सिद्धेश्वर वडगाव

येथे प्राचीन शिवमंदीर आहे. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी व महाशिवरात्रीच्या दिवशी भाविक प्रचंड प्रमाणात दर्शनासाठी येतात. हे ठिकाण उस्मानाबाद पासून 8 कि.मी.अंतरावर आहे.

थोडक्यात उस्मानाबाद जिल्ह्याची ओळख ही किल्ले, विविध ऐतिहासिक व पौराणिक स्थळे, हेमाडपंथी मंदिरे इत्यादीमुळे आहे. महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने समृध्द असा जिल्हा आहे. उस्मानाबाद जिल्ह्याला ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक वारसा लाभलेला असल्यामुळे अनेक पर्यटन स्थळांची निर्मिती झालेली आहे. परंतू मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांमध्ये म्हणाव्या तशा जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडाळने लक्ष घातल्यास, सोयीसुविधा वाढविल्यास उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांकडे अधिक प्रमाणात पर्यटकांची संख्या वाढेल. व त्यातून पर्यटन व्यवसायाला अधिक चालना मिळेल. .

संदर्भसूची

1) सामाजिक व आर्थिक समालोचन, उस्मानाबाद जिल्हा, 2018
2) डॉ.अनिल कठारे, नळदूर्गचा भुईकोट किल्ला, भारतीय हतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, वर्ष-37, पुस्तक 148, जाने-मार्च 2001, मुंबई, इतिहास संशोधन मंडळ, पृ.23
3) डॉ.शहा जी.बी. महाराष्ट्रातील उपेक्षित दुर्गांचा इतिहास, भाग- 2 , डोंबिवली, सुमेरू प्रकाशन, 2006 पृ.111
4) डॉ.कठारे अनिल व डॉ.नगराळे, मराठवाडयाचा इतिहास, कलपना प्रकाशन , नांदेड, 1999 पृ.425
5) कित्ता, पृ.430
6) हेमाद्री, चतुवर्ग चिंतामणी , वृत्तखंड, प्रस्तावना, पृ.7
7) पर्यटन भूगोल- डॉ.एस.बी.शिंदे फडके प्रकाशन, कोल्हापूर
8) www.google.com

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.